नि.दि.दा.क्र.४९/२०१०
कृष्णा / अंकुश
निशाणी क्र.**५६ खाली.**

**प्रतिवादीतर्फे साक्षीदार क्र.१ याचा उलटतपास वादीतर्फे विधिज्ञ श्री. डी. यु. पाटील यांच्यामार्फत शपथेवर सुरु:-**

**१३.** हे म्हणणे खरे आहे की, वादमिळकत ही माधवराव पाटील व दरुकोम पाटील यांच्या मालकीची होती. हे म्हणणे खरे आहे की, नरसिंग हा माधवराव पाटील यांचा मुलगा व लक्ष्मी पाटील ही नरसिंगची पत्नी आहे. माझ्या सांगण्याप्रमाणे माधवराव पाटील व दरुबाई यांनी नरहरी यास दिनांक ०८.१२.१९३० रोजी दत्तक घेतल्याचा कागदोपत्री पुरावा असुन तो मी दाखल करु शकतो. माधवराव पाटील यांचे मृत्यूपत्र मी न्यायालयात दाखल करु शकतो. लक्ष्मी पाटील ही सन १९८०, दरुबाई ही सन १९८३, नरसिंग पाटील हे १९३० च्या पुर्वी व माधवराव पाटील हे १९३४ साली मयत झाले आहेत. त्यांच्या मृत्यूचा पुरावा मी दाखल करु शकतो. माझे वडील वादमिळकत बटईने वहीती करत असल्याचे बटईपत्र माझ्याकडे असुन ते मी न्यायालयात दाखल करु शकतो. माझ्या वडीलांची वादमिळकतीस संरक्षित कुळाची नोंद असुन त्याच्या व्यतिरिक्त मला काही माहिती नाही. त्याबाबतीत सातबाऱ्याच्या उताऱ्याशिवाय माझ्याकडे इतर कोणताही दस्त नाही.

**न्यायालयीन वेळ संपल्यामुळे उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब करण्यात आला.**

श्रवणोत्तर निवेदन स्वीकृत

AMRAPALI BABURAO JONDHALE
Digitally signed by AMRAPALI BABURAO JONDHALE
Date: 2025.10.27 17:00:59 +0530

**(श्रीमती ए. बी. जोंधळे)**
सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, भूम.

दिनांक: २७.१०.२०२५